NagpurStudy.com

**TKN/KS/16/5787/5957/5995**

# Bachelor of Science (B.Sc.)/B.C.A./B.Sc.(I.T.) Semester—II (C.B.S.) Examination

## MARATHI

## Paper—II

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 60

सूचना :—(1) सुवाच्य अक्षरे, मुद्देसूद उत्तरे आणि शुद्धलेखन अपेक्षित.

(2) सर्व प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा (**200** शब्दात) :

(i) वैज्ञानिक दृष्टिकोण काळाची गरज.

(ii) मी मुख्यमंत्री झालो तर ! 12

2. खालील प्रश्नाचे उत्तरे लिहा (**200** शब्दात) :

'तुकोबांचे अंभग ज्ञान-विज्ञानाची सूत्रेच होती असे लेखकाला का वाटते ?

**किंवा**

'स्त्री-पुरुष स्वातंत्र्याला असलेले नगण्य स्थान याबाबत लेखिकेला काय वाटते ? 12

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा :

'जागतिकीकरणाच्या युगात नवी पिढी नैतिक मूल्यांपासून दूर जात आहे असे कवीला का वाटते' ?

**किंवा**



rtmnuonline.com

Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

'बदलत्या गावखेड्याचे जिवंत वास्तव चित्रण कवीने कोणत्या शब्दात व्यक्त केले आहे'. 12

4. खालील प्रश्नाची उत्तरे लिहा :

(अ) वारकरी संताविषयी सदानंद मोरेनी केलेले विवेचन थोडक्यात लिहा.

**किंवा**

सर्व शिक्षा अभियानातील विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर प्रकाश टाका. 3

(ब) कल्पनेची रेषा ओढून जमिनीला विभागता येते का ? स्पष्ट करा.

**किंवा**

'कवयित्रीने स्त्री वात्सल्याचे मनोवेधक दर्शन कसे घडविले आहे' ? 3

(क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(i) केसाने गळा कापणे

(ii) माशा मारीत बसणे

(iii) तळपायाची आग मस्तकात जाणे. 3

(ड) खालील शब्द शुद्ध करून पुन्हा लिहा :

(i) संस्कृति

(ii) पुर्वग्रह

(iii) सामाजीक



rtmnuonline.com

Scanned by CamScanner

NagpurStudy.com

(iv) परीवर्तन

(v) शुसिक्षित

(vi) नीदरशन. 3

5. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा :

"मित्र या शब्दातील खरे मर्म फारच थोड्या लोकांच्या अनुभवाला आलेले असते. बहुतेक लोक खऱ्या मैत्रीच्या प्रत्ययाला मुकलेले असतात व प्रत्ययावा चुनच मित्र हा शब्द ढिलेपणाने सहसा वापरीत असतात. एखाद्याचा अधिक सहवास झाला, की लगेच त्याचा मित्र म्हणून उल्लेख करण्यात येतो. जणू काय मैत्री हे सहवासाच्या वेलीला हमखास येणारे फळच आहे. खरे पाहता सहवास व मैत्री यांच्यात अन्योन्याश्रय फारच थोडा आहे. वाढत्या सहवासाबरोबर मित्रभाव परिपक्व व मधुर होत जातो. यात संशय नाही. परंतु सहवास वाढला की त्या मानाने स्नेह उत्पन्न झालाच पाहीजे; असे म्हणण्यासारखे आहे. पुवकळदा वेल मांडवभर पसरली तरी फुलत नाही. तद्‌वत वर्षानुवर्षे सहवास घडूनही खरा मित्रभाव उद्‌भवतच नाही आणि नुसत्या सहवासालाच लोक मैत्री समजतात पण किती भ्रामक समजूत आहे ही !" 4

(ब) राज्यस्तरीय वक्तृत्वस्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या मित्रास अभिनंदनपर पत्र लिहा. 4

(क) माहितीच्या अधिकारासंबंधी माहिती प्राप्त करण्याच्या कार्यपद्धतीचे स्वरूप सांगा. 4

rtmnuonline.com

Scanned by CamScanner